Reviews Of Progress
ISSN:-2321-3485
ORIGINAL ARTICLE
Vol - 1, Issue - 20, Sept 11 2013

# A STUDY OF CHILD LABOURS BOYE'S AND GIRL'S MENTAL HEALTH AND ADJUSTMENT

**PATIL ISHWAR POPAT**

Assistant Prof. Head Dept. of Psychology
Jijamata College of Science and Arts, Bhende, Ahmednagar.
(College Accredited at A grade by NAAC)

**सारांश :**

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून बरीच वर्षे झाली. या काळात जग खुप बदलले, ग्रामिण भागांचे रूपांतर शहरी भागात झाले. उद्योग धंद्याचा वेग वाढला, उत्पादन क्षमता प्रचंड प्रमाणात वाढली. एकाच प्रकारचे उत्पादन अनेक उत्पादक करू लागले. उत्पादित मालाचे गोडाऊन गच्च भरू लागले. आवश्यकतेपेक्षा अधिक मालाचे उत्पादन झाल्यामुळे उत्पादीत वस्तुंच्या किंमती कमी होऊ लागल्या. कारखानदारांना उत्पादित वस्तू खपविणे भागच असते. खर्च जास्त नफा कमी या परिस्थितीत कारखानदारावरील वाढता खर्च कमी करण्यासाठी मनुष्यबळा वरील खर्च कमी करणे,

**प्रस्तावना** :

कमीत कमी वेतनात जास्तीत जास्त स्वरूपाचे काम करून घेण्याचा अभिनव उपक्रम राबविण्याची कल्पना उद्योजकांना सुचू लागली. या कल्पनेतूनच प्रौढ कामगारापेक्षा बालकांना प्राधान्य देण्यांत येउ लागले. कमीत कमी वेतनात किंवा त्यापेक्षाही फक्त दोन वेळचे उदरभरण, अंगावरील कपडे, चमचमीत खाद्य पदार्थाचे अमिशापोटी दारिद्री बेरोजगार, कुपोशित कुटूंबातील बालकांची वाटचाल बालमजूरी कडे झाली. भारतीय घटनेतील [24–वा परिच्छेद] तरतुदीनुसार 14 वर्षाखालील कोणत्याही बालकास कोणतेही शारिरीक कष्टदायक कामावर तसेच कारखान्यात अथवा अन्य व्यवसायात ठेवता येणार नाही असे नमूद केले आहे. असे असून देखील आज अनेक ठिकाणी शहरी व ग्रामिण भागात बालकांकडून शारिरीक व मानसिक कष्टांची कामे करवुन घेतली जातात. भारतात दिल्ली, तामिळनाडु, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश व महाराष्ट्र इत्यादी राज्यामध्ये बालकामगारांचे प्रमाण अतिशय भयावह असल्याचे दिसून येते.

समस्या विधान (Statement of the Problem) :

' बालकामगार मुले मुली यांचे मानसिक आरोग्य आणि समायोजनाचा अभ्यास करणे '

उद्दिष्टये :

1.बालकामगार व सामान्य मुले–मुली यांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यास करणे.
2.बालकामगार व सामान्य मुले–मुली यांच्या कौटुंबिक समायोजनाचा अभ्यास करणे.
3.बालकामगार व सामान्य मुले–मुली यांचा सामाजिक समायोजनाचा अभ्यास करणे.
4.कौटुंबिक समायोजन आणि मानसिक आरोग्य यांच्यातील सहसंबंधात्मक अभ्यास करणे.
5.सामाजिक समायोजन आणि मानसिक आरोगय यांच्यातील सहसंबंधात्मक अभ्यास करणे.

परिकल्पना / गृहितके / अभ्युपगम (Hypotheses) :

1.बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले–मुली यांच्या मानसिक आरोगयात सुचक व भिन्नता आढळत नाही.
2.बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले–मुली यांच्या कौटुंबिक समायोजनात सुचक भिन्नता आढळत नाही.
3.बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले आणि मुली यांच्या सामाजिक समायोजनात सुचक भिन्नता आढळत नाही.
4.कौटुंबिक समायोजन आणि मानसिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आढळतो.
5.सामाजिक समायोजन आणि मानसिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आढळतो.

नमुना निवड :

संशोधनासाठी अहमदनगर शहर व जिल्हयातील बालकामगार म्हणून काम करणारे 50 मुले व 50 मुली तसेव जे कामगार म्हणुन काम करत नाहीत अशी शाळेत जाणारी 50 मुले आणि 50 मुली निवडण्यांत आल्या. सर्व मुले मुली 12 ते 14 वर्श वयोगटातील असून किमान प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेली बालके अभ्यासासाठी निवडण्यांत आली होती. बालकामगार व सामान्य मुले–मुली यांच्यामध्ये समरूपता ठेवण्याचा प्रयत्न संशोधकाने केला. नमुना निवड या दृच्छिक पध्दतीने करण्यांत आली.

आराखडा :

| मुलांचा प्रकार / लिंगभेद | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|
| बालकामगार | 50 | 50 | 100 |
| बालकामगार नसलेले सामान्य | 50 | 50 | 100 |
| एकुण | 100 | 100 | 200 |

चले / परिवर्तके ( Variables) :

अ. स्वतंत्र चले ( Independent Variables) :
1.बालकामगार मुले
2.बालकामगार मुली
3.बालकामगार नसलेले सामान्य मुले
4.बालकामगार नसलेले सामान्य मुली

ब. परतंत्र परिवर्तके (Dependend Variables) :

मानसिक आरोग्य चाचणीतील घटक

1.स्वताः विषयीचे सकारात्मक मुल्यमापन (Positive self evaluation)
2.वस्तुस्थितीचे संवेदन (Perception of reality)
3.व्यक्तिमत्वाचे संघटक ( Integration of personality)
4.स्वायत्तता / स्वातंत्र्य (Autonomy)
5 समुह केंद्रीत अभिवृत्ती (Group oriented attitudes)
6 परिसरीय प्रभुत्व (Environmental Mastery)

2.समायोजन चाचणीतील घटक (Independent Variables)
1.कौटुंबिक समायोजन (Home Adjustment)
2.समाजिक समायोजन ( Social Adjustment)

***प्रदत्त संकलनाची साधने :***

1.मानसिक आरोग्य चाचणी : (Mental Health Test) जगदीश श्रीवास्तव
2.बेल्सची समायोजन चाचणी : (शोधिका): (R.K.Ojha)

संख्याशास्त्रीय विश्लेषण
मानसिक आरोग्य या परिवर्तका विषयी द्विमार्गी प्रचरण विश्लेषण सारांश कोष्टक

| स्त्रोत | वर्ग बेरीज | मुक्ति प्रमाण संख्या | मध्यवर्ग | एफ मुल्य | लक्षणीयता | आशिक ईटा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| मुलांचा प्रकार | 11919.68 | 1 | 11919.68 | 151.53 | 0.01 | .436 |
| लिंग भेद | 380.88 | 1 | 380.88 | 4.842 | 0.05 | .024 |
| मुलांचा प्रकार व लिंगभेद | 233.28 | 1 | 233.28 | 2.966 | NS | –– |
| प्रमाद | 15417.28 | 196 | 78.66 | | | |
| एकुण | 5580396.00 | 200 | | | | |
| सुधारीत एकुण | 27951.12 | 199 | | | | |

मानसिक आरोग्य या परिवर्तकाविषयी नमुन्याबाबत गटनिहाय मिळालेले
वर्णनात्मक सांख्यिकी विवरण

| मुलांचा प्रकार | लिंगभेद | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना |
|---|---|---|---|---|
| बालकामगार | मुले | 158.60 | 8.68 | 50 |
| | मुली | 159.20 | 8.62 | 50 |
| | एकुण | 158.90 | 8.61 | 100 |
| सामान्य मुले–मुली | मुले | 171.88 | 8.90 | 50 |
| | मुली | 176.80 | 9.27 | 50 |
| | एकुण | 174.34 | 9.37 | 100 |
| एकुण | मुले | 165.24 | 11.00 | 100 |
| | मुली | 168.00 | 12.55 | 100 |
| | एकुण | 166.62 | 11.85 | 200 |

वरील कोष्टकामध्ये मानसिक आरोग्य या परिवर्तकाविषयी नमुन्याबाबत गटनिहाय मिळालेले वर्णनात्मक सांख्यिकी विवरण दर्शविण्यात आले आहे. यातून विविध गटांविषयीच्या प्राप्तांकांचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

कौटुंबिक समायोजन या परिवर्तकाविषयी नमुन्याबाबत गटनिहाय
मिळालेले वर्णनात्मक सांख्यिकी विवरण

| मुलांचा प्रकार | लिंगभेद | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना |
|---|---|---|---|---|
| बालकामगार | मुले | 6.94 | 1.11 | 50 |
| | मुली | 7.44 | 1.54 | 50 |
| | एकुण | 7.19 | 1.34 | 100 |
| सामान्य मुले–मुली | मुले | 6.50 | 1.25 | 50 |
| | मुली | 6.26 | 2.10 | 50 |
| | एकुण | 6.38 | 1.74 | 100 |
| एकुण | मुले | 6.72 | 1.20 | 100 |
| | मुली | 6.85 | 1.92 | 100 |
| | एकुण | 6.78 | 1.60 | 200 |

वरील कोष्टकामध्ये कौटुंबिक समायोजन या परिवर्तकाविषयी नमुन्याबाबत गटनिहाय मिळालेले वर्णनात्मक सांख्यिकी विवरण दर्शविण्यात आले आहे. यातून विविध गटांविषयीच्या प्राप्तांकांचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

सामाजिक समायोजन या परिवर्तकाविषयी नमुन्याबाबत गटनिहाय
मिळालेले वर्णनात्मक सांख्यिकी विवरण

| मुलांचा प्रकार | लिंगभेद | मध्यमान | प्रमाण विचलन | नमुना |
|---|---|---|---|---|
| बालकामगार | मुले | 6.12 | .98 | 50 |
| | मुली | 7.04 | 1.56 | 50 |
| | एकुण | 6.58 | 1.38 | 100 |
| सामान्य मुले–मुली | मुले | 6.42 | 1.18 | 50 |
| | मुली | 7.36 | 2.29 | 50 |
| | एकुण | 6.89 | 1.87 | 100 |
| एकुण | मुले | 6.27 | 1.09 | 100 |
| | मुली | 7.20 | 1.96 | 100 |
| | एकुण | 6.74 | 1.65 | 200 |

वरील कोष्टकामध्ये सामाजिक समायोजन या परिवर्तकाविषयी नमुन्याबाबत गटनिहाय मिळालेले वर्णनात्मक सांख्यिकी विवरण दर्शविण्यात आले आहे. यातून विविध गटांविषयीच्या प्राप्तांकांचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

कौटुंबिक समायोजन या परिवर्तका विषयी द्विमार्गी प्रचरण विश्लेषण सारांश कोष्टक

| स्त्रोत | वर्ग बेरीज | मुक्ति प्रमाण संख्या | मध्यवर्ग | एफ मुल्य | लक्षणीयता | आशिक ईटा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| मुलांचा प्रकार | 32.805 | 1 | 32.805 | 13.702 | 0.01 | .065 |
| लिंग भेद | .845 | 1 | .845 | .353 | NS | –– |
| मुलांचा प्रकार व लिंगभेद | 6.845 | 1 | 6.845 | 2.859 | NS | –– |
| प्रमाद | 469.260 | 196 | 2.394 | | | |
| एकुण | 9717.000 | 200 | | | | |
| सुधारीत एकुण | 509.755 | 199 | | | | |

समाजिक समायोजन या परिवर्तका विषयी द्विमार्गी प्रचरण विश्लेषण सारांश कोष्टक

| स्त्रोत | वर्ग बेरीज | मुक्ति प्रमाण संख्या | मध्यवर्ग | एफ मुल्य | लक्षणीयता | आशिक ईटा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| मुलांचा प्रकार | 4.805 | 1 | 4.805 | 1.911 | NS | –– |
| लिंग भेद | 43.245 | 1 | 43.245 | 17.196 | 0.01 | .081 |
| मुलांचा प्रकार व लिंगभेद | .005 | 1 | .005 | .002 | NS | –– |
| प्रमाद | 492.900 | 196 | 2.515 | | | |
| एकुण | 9613.000 | 200 | | | | |
| सुधारीत एकुण | 540.955 | 199 | | | | |

बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले–मुली यांच्या दरम्यान विविध घटकांमध्ये आढळणारा फरक

| परीवर्तके (चले) | मुलांचा प्रकार | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | टी मुल्य | लक्षणीय पातळी |
|---|---|---|---|---|---|---|
| मानसिक आरोग्य | बालकामगार | 100 | 72.99 | 10.43 | 4.277 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 79.96 | 12.52 | | |
| सकारात्मक स्वमुल्यमापन | बालकामगार | 100 | 28.62 | 3.79 | 3.602 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 30.78 | 4.65 | | |
| वास्तवतेचे संवेदन | बालकामगार | 100 | 24.41 | 3.86 | 3.733 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 26.26 | 3.11 | | |
| व्यक्तिमत्वाशी एकरुपता | बालकामगार | 100 | 32.22 | 3.66 | 8.518 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 37.07 | 4.36 | | |
| स्वातंत्र्य | बालकामगार | 100 | 17.52 | 3.15 | 3.416 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 18.96 | 2.80 | | |
| समुहकेंद्रित अभिवृत्ती | बालकामगार | 100 | 28.81 | 3.43 | 2.938 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 30.30 | 3.73 | | |
| परीसरीय प्रभुत्व | बालकामगार | 100 | 27.32 | 2.65 | 7.621 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 30.97 | 3.99 | | |
| समायोजन | बालकामगार | 100 | 158.90 | 8.61 | 12.13 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 174.34 | 9.37 | | |
| कौटुंबिक समायोजन | बालकामगार | 100 | 6.38 | 1.34 | 3.690 | 0.01 |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 7.19 | 1.74 | | |
| समाजिक समायोजन | बालकामगार | 100 | 6.58 | 1.38 | 1.332 | NS |
| | सामान्य मुले–मुली | 100 | 6.89 | 1.87 | | |

निष्कर्ष :

1.बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले–मुली यांच्या मानसिक आरोग्यात फरक आढळून आला.
2.बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले–मुली यांच्या कौटुंबिक समायोजनात फरक आढळून आला.
3.बालकामगार व बालकामगार नसलेले सामान्य मुले–मुली यांच्या सामाजिक समायोजनात सुचक भिन्नता आढळून आली नाही.
4.बालकामगार मुले व बालकामगार मुली यांच्या सामाजिक समायोजनामध्ये फरक आढळून आला.
5.बालकामगार नसलेले सामान्य मुले व बालकामगार नसलेल्या सामान्य मुली यांच्या मानसिक आरोग्यात आणि सामाजिक समायोजनात

फरक आढळून आला.
6.कौटुंबिक समायोजन व मानसिक आरोग्य यांच्यात धनात्मक सहसंबंध आढळतो.
7.सामाजिक समायोजन व मानसिक आरोग्य यांच्यामध्ये धनात्मक सहसंबंध आढळतो.

मर्यादा (Limitations) :

1.अभ्यासातील निष्कर्ष किमान नमुन्यावर आधारीत आहेत.
2.संशोधनातील नमुना फक्त अहमदनगर जिल्हयापुरताच मर्यादित आहे. त्यामुळे अभ्यासातील निश्कर्श या जिल्हयापुरतेच मर्यादित आहेत.
3.सदरचे संशोधन हे 12 ते 14 वयोगटापुरतेच मर्यादित आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षण पुर्ण केले बालकामगार व तुलनात्मक गट म्हणून घेतलेले बालकामगार नसलेले त्याच वयोगटातील सामान्य मुलांपुरते मर्यादित आहे.

शिफारशी व उपाययोजना (Recommendations) :

- बालकामगार मुले–मुली यांच्या शारीरिक व भावनिक पातळीवरील गरजा लक्षात घेऊन प्रस्तुत संशोधनात संशोधकास असे निदर्शनास आले की, बालमजुरी ही अत्यंत भयंकर समस्या असून पुढील उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

1.शिक्षणाचा योग्य प्रसार करून बालकामगारांमध्ये योग्य शैक्षणिक दृश्टिकोन निर्माण केला पाहीजे. त्यासाठी बालकामगारांना शैक्षणिक सुविधा पुरविणे, योग्य जिवनोपयोगी व व्यावसायिक प्रशिक्षण देणे, ज्या कुटुंबातील बालकामगारास काम करणे अपरीहार्यच असेल उदा. कुटुंबकर्त्याचा अपघात, अपंगत्व वा मृत्यूमूळे कुटुंबराची आर्थिक जबाबदारी अचानक आली असेल अशा बालकामगारांसाठी योग्य व्यावसायिक प्रशिक्षण देणे.
2.शालेय माध्यमिक व विविध शैक्षणिक स्तरांवर विविध संघटना तयार करून बालकामगार संशोधन व पुनर्वसन कार्याची जबाबदारी सोपविणे व विविध सरकारी योजनांची काटेकोर अंमलबजावणी होण्यासाठी विविध पातळींवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.
3.सदर संशोधन विषयासंदर्भात जास्त व्यापक संशोधनाची गरज आहे.
4.प्रस्तुतच्या विशयात कौटूंबिक पार्श्वभुमी, सामाजिक आर्थिक दर्जा आणि पालकांच्या अभिवृत्तीच्या दृष्टिकोनातून पध्दतशीर अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.
5.बालकामगार मुला–मुलींचा व्यक्तिमत्व विकास चांगल्याप्रकारे होण्यासाठी पालकांनी व बालकामगार क्षेत्राात काम करणा–या व्यक्तिंनी प्रयत्न करण्याची गरज आहे.
6.बालकामगारांना मानसशास्त्रीय सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करुन द्यायला हवे. जेणेकरुन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होऊ शकेल.

संदर्भसूची (Bibliography) :


- Andeson D.R.(1978). Burnham K.P. Thomson W.L.(Submitted) Null hypothesis testing in Economical studies problem prevalence and alternative.
- Bhardwaj A.R. and Mrs. Bhardwaj M.A.(2003) : Child labourers in India Myth and Reality Research paper presented in National Seminar on child labourerproblem and rehabilitation Deopur, Dhule,Maharashtra ( 28 Feb.2003)
- Borse A.S. and Deore L.D.(1996) : Child Labourer and their abuse paper presented in International conference of applied Psychology and JAAP conference Gurukul Kangri University, Hardwar (Feb. 1996)
- Borse Ashok and Datir Prakash (2003) Rehabilition of child labourers against abuse Abstract on National seminar on Child Labourer problem sand rehabilation at Deopur Dhule Maharashtra.
- Chavan, Khattar and Tiwari (1972). Psychology of Adujustment and Human Relations. Random book publisher, New Delhi. Page 177-189.
- Daltam (1958) Child labour in India Economic and Political weekly Vol. XXXI No. 45 and 46 Nov. PP.9-16
- Deshpande C.G. (2003) Developmental Defects among child labour Abstract on National seminar on Child Labourer problems and rehabilation at Deopur Dhule Maharashtra.
- Easter D. & Crow (1996). The Child and the State in India Child labour and education policy in comparative perspective Princeton Unversity Press Princeton.
- ILO (1996). Child Labour : What to be done? Document for discussion at the informal tripartisl meeting at the minister level, ILO, Geneva.
- Lazarus R.S. (1984) Patern of Adjustment and human effectiveness MC.Graw Hill Kogakursha Inernational edition.
- Parker D. (1997)X Child Labour. The impact of Economic exploitation on the Health and welfare of children-Minnesota Medicine 1997: 80(7):10-13-52,55.
- Rasal P.V.(2003) Mental Health and quality of life in child labourer Research paper presentation of National conference Dhule (Maharashtra) 2003.
- Ravi Gunthey and Nidhi Jain : (2003) TRUTHS: A practical experience abstract National seminar on child labourer problem and rehabilitation on 28 Feb. 2003.
- Shinde V.R.(2003) Child labour A Maladaptive And Deviant Behaviour Approach. Research paper presented in National Seminar on child labourer problem and rehabilation Deopur Dhule, Maharashtra ( 28 Feb. 2003)
- Sulivan (1993) Female Child Labour and Gender Bais Social Education in India States 1961-1991.

The General of Labour Economics No.3 Vol.40 July 40 July September.
- The Child labour (1986). Prohibition and regulation act. 1986. Professional book publisher, New Delhi.
- Parikh B.A.(2003) : Child labourer A social psychological Economic Problem Abstract on National seminar on Child Laborer problems and rehabilation at Deopur Dhule Maharashtra.